# पुण्यातून सुरू व्हावी 'मद्यमुक्ती'ची क्रांती

## डॉ. बंग यांची अपेक्षा; दहाव्या पुलोत्सवाचे उद्‌घाटन



न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग : महाराष्ट्राचा खरा दागिना असलेल्या 'पुलं'ना आदरांजली वाहणाऱ्या 'पुलोत्सवा'त सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांना डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते 'पुल कृतज्ञता सन्मान' रविवारी प्रदान करण्यात आला.

पुणे, ता. ४ : "मद्यनिर्मिती मोठ्या प्रमाणात होत असल्याने महाराष्ट्र हा 'मद्यराष्ट्र' होत आहे. तीस हजार कोटी रुपयांची दारू वर्षाला खपत असून यातून सरकार ८ हजार कोटी रुपये कमवत आहे. हा भस्मासुर वेळीच ओळखायला हवा. त्यासाठी आपल्याला 'मद्यमुक्ती'ची नवी क्रांती करायला हवी आणि याची सुरवात पुण्यापासून व्हावी," अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी रविवारी येथे व्यक्त केली.

'आशय सांस्कृतिक'तर्फे आयोजित दहाव्या पुलोत्सवाचे उद्‌घाटन साहित्य संमेलनाचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांच्या हस्ते डॉ. बंग यांना 'पुल कृतज्ञता सन्मान' प्रदान करण्यात आला. पुणेरी पगडी, रोख रक्कम, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. 'फिल्मसिटी'चे संचालक लक्ष्मीकांत देशमुख, 'पु. ना. गाडगीळ अँड सन्स'चे अभय गाडगीळ, 'आशय'चे वीरेंद्र चित्राव, सतीश जकातदार उपस्थित होते. डॉ. बंग म्हणाले, "विद्यानगरी, सांस्कृतिक नगरी, पुल-सुनीताबाई यांच्या आणि तुमच्या-आमच्या पुण्यात रेव्ह-चिल्लर पार्ट्या होतात. हे चित्र चिंताजनक आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रांती झाली. त्यानंतर अण्णा हजारे यांचे आंदोलन व इतर घटनांमधून नागरिकांची क्रांती, युवा क्रांती अनुभवायला मिळाली. आता 'मद्यमुक्ती'ची नवी क्रांती व्हायला व्हावी. न्यूयॉर्क तंबाखूमुक्त होऊ शकते, तर पुणे 'मद्यमुक्त' नक्कीच होईल. 'पुल' हे आनंदाचे कारंजे होते. महाराष्ट्राच्या संस्कृतीची कारंजी इथूनच पुढे सर्वत्र थुईथुई नाचायला हवीत."

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, "पुल म्हणजे जीवनावर प्रेम करायला लावणारा, शिकवणारा, जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणारा लेखक होय. त्यांचा विनोद हा प्रेमातून, करुणेतून निर्माण झाला. म्हणूनच त्यांच्या विनोदावर आपण आजही हसतो."

### 'टीम अण्णा'चे नॅनो पॉलिटिक्स

"टीम अण्णा'त सहभागी होण्याचे आमंत्रण मला आले. त्यांच्या आंदोलनाचे मी स्वागतही करतो. हे 'नॅनो पॉलिटिक्स' आहे. पण या आंदोलनात मी सहभागी होणार नाही. आंदोलनात चांगल्या गोष्टी असतात, तसे दोषही असतात. तेच मला या आंदोलनातही दिसते. शेवटी मी गडचिरोली आणि या भागातील नागरिकांशी बांधील आहे," असे डॉ. बंग यांनी सांगितले. पुरस्कार समारंभानंतर सुधीर गाडगीळ यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

---



लोकमत ५ नोव्हेंबर

नेतृत्व वक्तृत्व प्रशिक्षण
पुणे बारामती
स्टेजडेअरिंग, सूत्रसंचालन, भाषणकला, देहबोली, संभाषणकला, जनसंपर्क
१० पुस्तके CD फ्री..
प्रशिक्षक : शशांक मोहिते
(व्याख्यान, सूत्रसंचालन, निवडणूक व्यवस्थापन तसेच पॉलिटिकल इमेज मेकिंगमधील Practical अनुभव...)
9960066966

# 'मद्य'राष्ट्राचे राजकीय विद्यापीठ बारामती!

## डॉ. अभय बंग यांचा घणाघात; पुण्याकडून मद्यमुक्ती क्रांतीची अपेक्षा

पुणे । दि. ४ (प्रतिनिधी)

"सांस्कृतिक शहर म्हणवणाऱ्या पुण्यात रेव्ह आणि चिल्लर पार्ट्या होण्याचे कारण म्हणजे महाराष्ट्र हे मद्यराष्ट्र झाले असून, याचे राजकीय विद्यापीठ बारामतीला आहे." अशी घणाघाती टीका ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी पुण्यात बोलताना केली.

दहाव्या पुलोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. बंग यांच्याशी ज्येष्ठ निवेदक सुधीर गाडगीळ यांनी संवाद साधला. डॉ. बंग म्हणाले, "एवढ्या मोठ्या प्रमाणात मद्यनिर्मिती होणार असेल तर त्याची विल्हेवाट लावण्याचेही मार्ग शोधलेच जाणार. हातभट्टी कशी लावावी याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. हा भस्मासुराचा शाप आहे. त्यामुळे पुण्याकडून मद्यमुक्ती क्रांतीची अपेक्षा आहे."

"देशात तीन महत्त्वाच्या क्रांती आहेत. तंत्रज्ञानाची क्रांती माणसाला एकटेपणाच्या गुंत्यातून बाहेर काढून माहितीच्या सागरात स्वच्छंद फिरवत आहे. तसेच अण्णा हजारेंसारख्या आंदोलनांमुळे नागरी क्रांती घडत आहे. हजारे यांनी या आंदोलनाने देशाच्या ठसठसत्या गळवाला चिरा दिल्या आहेत. सध्या बाहेर येणारी भ्रष्टाचाराची प्रकरणे म्हणजे त्यातील पू आहे. त्याचा निचरा होणे आवश्यकच आहे.

सर्वसामान्यांना घेऊन होणारे हे नॅनो राजकारण सरकारला आव्हान देत आहे. ही चांगली बाब आहे. मी अण्णांच्या आंदोलनाचे स्वागत, आदर करतो. परंतु मी स्वतः त्यात सहभागी होणार नाही. मी माझ्या सुरू असलेल्या कामाशीच प्रामाणिक आहे," असेही डॉ. बंग यांनी स्पष्ट केले.

→ संबंधित छायाचित्र ८ वर

"बारामतीला येणारे द्राक्षाचे वायनरी प्लॅन्ट, किंगफिशरशी हात मिळवणी याची कमी होती म्हणून की काय पुणे विद्यापीठात वाईन टेक्नॉलॉजीचा अभ्यासक्रम सुरू होणार आहे, असे ऐकायला मिळाले, हे थांबले पाहिजे.

- डॉ. अभय बंग



# कृतज्ञता सन्मान..!




- आशय सांस्कृतिकच्या वतीने दहाव्या पुलोत्सवाचे उद्घाटन ८६व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते झाले. डॉ. अभय बंग यांना कृतज्ञता सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्मृतिचिन्ह, मानपत्र व ५१ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते.
- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणाले, की स्वातंत्र्यापूर्वी १०० वर्षे स्वातंत्र्यानंतरचा देश कसा असावा याचे चिंतन केले गेले. मात्र ते स्वप्नातले स्वराज्य साकार झालेले दिसत नाही. परंतु जेव्हा निष्ठेने सामाजिक कार्य करणारे लोक बघतो त्या वेळी आज स्वराज्य नसले तरी उद्याचा देश सुंदर असेल असा आशावाद वाटतो. पु. लं.नी जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघायला शिकविले. जीवनाच्या जवळ नेऊन त्यावर प्रेम करायला शिकविणारा हा लेखक होता.
- फिल्म सिटीचे कार्यकारी संचालक लक्ष्मीकांत देशमुख, महोत्सव संयोजक सतीश जकातदार व वीरेंद्र चित्राव उपस्थित होते. ज्येष्ठ निवेदक सुधीर गाडगीळ यांनी डॉ. बंग यांच्याशी संवाद साधला. सुप्रिया चित्राव यांनी सूत्रसंचालन केले.